Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2409III07V12P0010

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(VIII), Volume–XII

# भारतातील **शैक्षणिक असमानतेचा अभ्यास**

**अविनाश एकनाथ वासनिक ,**
**एम.एस.डब्ल्यू., सेट**

**गोषवारा :-**

हा अभ्यास प्रत्येक शहरात , सामाजिक वर्गामध्ये अस्तित्वात असलेलेया शैक्षणिक असमानतेचा विचार करतो आणि भारतीय समाजात शैक्षणिक असमानतेला आळा घालतो . भारतीय शैक्षणिक असमानतेचे वास्तव अतिशय गुंतागुंतीचे आणि वैविध्यपूर्ण आहे कारण शैक्षणिक असमानता प्रत्येक क्षेत्रात व समाजात अस्तित्वात आहे .

शिक्षण , रोजगाराच्या संधी , उत्पन्न , आरोग्य , सांस्कृतिक समस्या, सामाजिक समस्या, आर्थिक समस्या इत्यादी बाबींना कारणीभूत घटक शोधण्याचा प्रयत्न केला गेला आहे . तर हा पेपर भारतीय समाजात प्रचलित असलेल्या शैक्षणिक असमानतेच्या बहुआयामी संदर्भावर प्रकाश टाकतो . एकूणच हा अभ्यास आर्थिक , सामाजिक , सांस्कृतिक आणि कायदेशीर पक्षपाती पनातील असमानता सर्शविती जे संपूर्ण सामाजिक क्षेत्रात शैक्षणिक समानता प्रस्थापित करण्यासाठी आणि भारतीय समाजातील व्यक्तींना सन्मानानी स्थान, सर्वांगीण विकास , रोजगार तसेच योग्य व आदर्श व्यक्ती घडविण्यास काही संबंधित मुद्दे सुचविण्याचा प्रयत्न केला आहे .

**कीवर्ड** : शैक्षणिक असमानता , आर्थिक , सामाजिक आणि सांस्कृतिक समस्या

परिचय : स्वातंत्रपूर्व काळ व स्वातंत्रोत्तर काळानंतर तसेच सद्याच्या परिस्थितीत धोरणकर्त्यांचे , शिक्षण तज्ञांचे आणि समाजशात्रज्ञांचे लक्ष वेधून घेतलेल्या समस्यांपैकी एक म्हणजे शैक्षनिक समस्या . शैक्षणिक समस्या म्हणजे शालापूर्व, शाळा प्रवेश्यानंतर विद्यार्थीयांच्या शिक्षनावर होणाऱ्या परिणामावर चर्चा , भारतीय समाजातील मुले व मुली जरी शैक्षणिक असमानतेने ग्रस्त असले तरी इतर सामस्यानमधून शैक्षणिक असमानता भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात दिसून येते . सरकारी, खाजगी संस्थानमध्ये आता शैक्षणिक असमानतेचा विचार केला

https://doi.org/10.69758/GIMRJ/2409III07V12P0010
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(VIII), Volume–XII

जातो . धोरण निर्माते व शिक्षण तज्ञांना असा ठाम विश्वास आहे कि शैक्षणिक समानतेसाठी सकारात्मक वचनबद्धतेमुळे मागासलेपण कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत होईल . कारण शैक्षणिक मागासलेपणाच्या बळी ह्या मोठ्या प्रमाणावर मुली व गरीब कुटुंबातील मुले व मुली ठरतात .

**शैक्षणिक असमानता** : शैक्षणिक असमानता म्हणजे समजा अंतर्गत आढळून येणारे साक्षरता , प्राथमिक शिक्षण , माध्यमिक व उच्च शिक्षणाचे असमान प्रमाण तसेच शैक्षणिक संसाधनांचे असमान वितरण, ज्यामध्ये शालेय निधी, पात्र आणि अनुभवी शिक्षक, पुस्तके, भौतिक सुविधा आणि तंत्रज्ञान यांचा समावेश आहे, परंतु त्यापुरते मर्यादित नसून सामाजिकरित्या बहिष्कृत समुदायांना भेडसावणाऱ्या समस्यांचा सुद्धा यात समावेश होतोहे समुदाय ऐतिहासिकदृष्ट्या वंचित आणि . .अत्याचारित आहेत भारत शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत ३३ व्या स्थानावर आहे .सन २०२३ च्या सर्वेनुसार भारतातील साक्षरतेचे प्रमाण 77.77 टक्के असून पुरूष साक्षरता हि ८२.१४ टक्के व स्त्री साक्षरता हि ६५.४६ टक्के आहे.

**अभ्यासाची उद्दिस्टे :-**

१. शैक्षणिक असमानतेसाठी कोणते घटक कारणीभूत आहेत ते ओळखणे .
२. शैक्षणिक समानता निर्माण करण्यासाठी सूचना करणे

**भारतीय समाजातील शैक्षणिक असमानतेची कारणे खालील प्रमाणे आहेत**

१.महिलांना मागासलेपणाचा दर्जा :- महिलांना मागासलेपणाचा दर्जा असल्यामुळे महिलांना शिकविण्यास प्राधान्य दिले जात नाही.

२.आर्थिक असमानता :- भारतीय समाजात मोठ्या प्रमाणावर पूर्वीपासून आर्थिक असमानता आढळून येते . सदरील असमानतेमुळे शैक्षणिक असमानता निर्माण झालेली आहे . आर्थिक दृष्ट्या मागासले लोक त्यांच्या पाल्यांना शिक्षणा एवेजी अर्थिक मिळकतीसाठी कामावर पाठविणे अधिक पसंत करतात .

३.लिंगभेद :- भारतातील काही राज्य वगळता इतर राज्यांत मोठ्या प्रमाणावर लिंगभेद आढळून येतो . लिंगभेदामुळे मुलींपेक्षा मुलांना अधिक शिकविण्यावर भर दिला जातो . परिणामी मुलीना अशिक्षित ठेवल्यामुळे समस्या निर्माण होते .

४.जातीभेद:- आजच्या प्रगत समाजात सुद्‌धा आजही मोठ्या प्रमाणावर जातीभेद आढळून येतो. सदरील जातीभेदामुळे मागासल्या जातीतील लोक मुलीना शिकवण्यास उदास असतात तसेच वरच्या जातीतील लोक सुद्‌धा खालच्या समाजातील मुलींच्या शाळाप्रवेशास उत्सुक राहत नाहीत तसेच स्वत:च्या समाजातील मुलींना सुद्‌धा शिकविण्यास उत्सुक राहत नाहीत.

५.तांत्रिक अडचणी :- आजच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात सुद्‌धा प्रगत शिक्षण देण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने लोक मुलांना शिकविण्यास तसेच मुले शिक्षण घ्येण्यास फार उत्सुक राहत नाहीत

६.बालकामगार :-बालकामगारी हा शैक्षणिक असमानतेतील महत्वाचा घटक आहे . लोक मुलांना शाळेत पाठविण्यापेक्षा कामावर पाठविणे अधिक पसंत करतात .

७.अपरिणामकारक प्राथमिक शालेय शिक्षण :-आजच्या समाजात मुलांच्या गरजेनुसार प्रात्यक्षिक शिक्षणा ऐवजी शालेय शिक्षणावर अधिक भर दिला जात असल्याने मुले शाळा सोडतात व परिणामी शैक्षणिक असमानता निर्माण होते

८.तांत्रिक शिक्षणाचा अभाव :- शालेय शिक्षनासह तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची कमतरता असल्यामुळे तांत्रिक शिक्षणाचा अभाव निर्माण झाल्याने मुलांची रुची कमी होऊन मुले शाळा सोडतात

९.राजकीय द्रुडनिश्चयाची उणीव : राजकीय द्रुडनिश्चय असल्यास वरील प्रमाणे सर्व अडचणी सोडविल्या जाऊ शकतात परंतु मोठ्या प्रमाणावर राजकीय द्रुडनिश्चयाची उणीव दिसून येते .

१०.सामाजिक कारणे :- मुलींना खालच्या दर्जाचि वागणूक , मुलींच्या सुरक्षीततेच्या समस्या , कमी वयात विवाह , बालविवाह हि सर्व सामाजिक कारणे आहेत .

११.शैक्षणिक कारणे :- आई वडील व पालकांची शैक्षणिक पार्श्वभूमी , कमी शिक्षण अथवा निरक्षरपणा हे महत्वाचे कारणीभूत घटक आहेत .

१२.वैयक्तिक कारणे :- कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचे आजारपण , गरिबी , दारिद्र्य इत्यादी वैयक्तिक कारणे शैक्षणिक मागासलेपनास जबाबदार आहेत .

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2409III07V12P0010

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(VIII), Volume–XII

**विश्लेषण :-** भारतीय समाजातील शैक्षणिक असमानतेसाठी अनेक घटक कारणीभूत आहेत . भारतीय समाजात शैक्षणिक समानता निर्माण करणे अत्यावश्यक आहे . शिक्षणाचा मुलभूत हक्क अधिनियम ४ ऑगस्ट २००९ रोजी पारित होऊन सुद्धा आजही शैक्षणिक असमानता आढळून येते हि चिंतेची बाब आहे . समाजात शैक्षणिक समानता निर्माण करण्यासाठी अजून पुष्कळ काम होणे आवश्यक आहे . केवळ कायदे करून चालणार नाही .

**सूचना :-** प्रत्येक समस्यावर उपाय आहे . भारतीय समाजातील शैक्षणिक असमानता दूर करण्यासाठी मुलांना ते राहत असलेल्या ठिकाणच्या कामी येणारे शिक्षण मुलांना दिले पाहिजे . तांत्रिक शिक्षण हे केवळ कागदावर अथवा पुस्तका पुरते मर्यादित न ठेवता मुलांना त्यांच्या गरजेनुसार प्रत्यक्ष दिले गेले पहिजे . धोरण कर्त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून आनंददायी शिक्षण व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या अडचणी लक्षात घेऊन शैक्षणिक ध्येयधोरणे ठरविली पाहिजेत. शैक्षणिक समानता तेव्हाच होईल जेव्हा पालकांच्या मनोवृत्तीत बदल होऊन प्रत्येक मुलाच्या मनात शिक्षणाविषयी गोडी निर्माण होईल .

संदर्भ :-

१.**EDUCATION SYSTEMS IN INDIA: Issues, Challenges and Problems -** Mrs.D.Shobana and Dr.Nityanath , Dr.Dilipkumar A. Ode.

२. **Being A 21St Century Educator-** Mrs.Sudha Mahesh